INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# लोकगीतांचा सांस्कृतिक आणि भौगोलिक दृष्टीकोनातून केलेला अभ्यास

सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार

पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रस्तावना :

भाषेचा किंवा लिपीचा शोध लागण्यापूर्वी लोकसाहित्याची निर्मिती झाली आहे. कारण लोकसाहित्य हे जीवन घडविणारे एक महत्वाचे साधन आहे. लोकसाहित्याच्या माध्यमातून माणूस आपल्या भावभावना कल्पना, विचार प्रकट करत असतो. लिपीचा शोध लागण्यापूर्वी मानवाने लोकसाहित्याच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेतलोकसाहित्याची रचना सहजस्फूर्त अशी असते. तिच्यात कुठल्याही प्रकारची ओढाताण नसते. तसेच लोकसाहित्य ही एक अनामिकाची निर्मिती असतेते मौखिक परंपरेने एका पिढीपासून दूसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेले असतेत्याला कुणीही लिपीबध्द केलेले नसते. तसेच तो समुह मनाचा अविष्कार असतो.लोकसाहित्यात सामूहिकतेला महत्व असतेज्या प्रदेशात हे लोकसाहित्य निर्माण झालेले असते त्या प्रदेशाचा तो खरा वारसा, मूलधन, लाखमोलाचा खजिना असतो. खेडयातील माणसाने म्हणजेच अशिक्षित माणसाने जतन करून ठेवलेली ती एक ठेव असल्यामुळे त्याचे खरे वारसदार खेडयातील माणसेच असतात. कारण लोकसाहित्य म्हणजे खेडयातील माणसाचे अलिखित अक्षर वाङमय होय. लोकसाहित्य म्हणजे लोकांच्या पारंपारिक लोकजीवनाचा शब्दबध्द अविष्कार असतो. तसेच लोकसाहित्याचा दूसरा महत्वाचा भाग म्हणजे भौतिक सांस्कृतिचे चित्रण लोकसाहित्यात फार मोठया प्रमाणात आलेले असते. लोकसाहित्यातील आणखी एक महत्वाचा भाग म्हणजे लोकरुढी, विधी, समजुती हा होय.

शोधनिबंधाची उदिष्टये :

1 लोकसाहित्य हे लोकसंस्कृतिचे एक अंग असते. हे अभ्यासने.
2 साहित्यातील लोकगीत ही संकल्पना स्पष्ट करणे.
3 संस्कृती आणि साहित्याच्या आधारे लोकगीतांचा अभ्यास करणे.

4 लोकसंस्कृतिवर सीमाप्रदेशांचा प्रभाव अभ्यासणे.
5 महाराष्ट्र आणि आंध्र सीमेवरील लोकगीत अभ्यासणे

गृहितके :

1 लोकसाहित्य आणि संस्कृती यांचे मौलिक संशोधन करणे.

2 लोकगीतातून संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे.

3 लोकगीतांचा सांस्कृतिक, वारसा, परंपरा जपण्यासाठी नवतेचा शोध घेणे.

4 सीमाप्रदेशातील भौगोलिक, सांस्कृतिक दृष्टीकोनातून लोकगीत अभ्यासणे

तेलंगणा आणि महाराष्ट्र संस्कृती महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशातील किंवा दोन्ही प्रदेशाचे विभाग असलेल्या मराठवाडा व तेलंगणाची संस्कृती या संबंधीचा विचार करत असतांना भूगोल वेगळा असण्याचा एक मुददा असा तर आहेच. पण दुसराही एक महत्वाचा भाग असा आहे की, या दोन संस्कृती भारताच्या दोन विभागाच्या प्रतिनिधीक आहेत. उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्या मधल्या पर्वत रांगा आणि घनदाट अरण्ये यांच्यामुळे दक्षिण भारताचे फार मोठया प्रमाणात आर्यीकीकरण हो ऊशकले नाही. दक्षिण भारत हा वंश, भाषा, धर्म, इ. च्या दृष्टीने द्रवीड संस्कृती प्रधानच राहिला. उत्तर भारताप्रमाणे त्यांचे आर्यावर्त झाले नाहीमहाराष्ट्र या आर्यावर्ताचा म्हणजे उत्तर भारताचा प्रतिनिधी आणि मराठवाडा व तेलंगणाच्या सीमारेषा ज्या ठिकाणी एकमेकास भारतात भेटतात त्या प्रदेशात या दोन्ही संस्कृतीचा म्हणजे आर्य द्रविड संस्कृतीचा संगम आढळतोमराठवाडयातील औरंगाबाद नंतर नांदेड जिल्हा सर्वात मोठा व महत्वाचा असा जिल्हा आहे या जिल्हयाला समृद्ध इतिहास व साहित्याचे लेणे लाभलेले असून सर्व क्षेत्रात या जिल्हयानेमोठी झेप घेतली आहे. 14 व्या शतकापासून नांदेडचा उल्लेख अभिलेखातून प्राप्त होतो. आंध्र, कर्नाटक, या सीमा असल्यामुळे या जिल्हयात तेलुगू, कन्नड, या भाषेचा परिणाम झाला, मराठी, हिंदी, तेलुगू व वऱ्हाडी मराठवाडी या सर्व भाषांचा येथे वापर होतो. सप्टेंबर 1948 पर्यंत या जिल्हयाकडे व पर्यायाने मराठवाडयाकडे निजाम सरकारने दुर्लभ केले होते. त्यामुळे खऱ्या विकासाचा वेग राज्य पुनर्रचनेनंतर

वाढला हे निश्चितच अशा या नांदेड जिहयातील भोकर, किनवट, बिलोली, देगलूर, धर्माबाद, हे पाच तालुके असून तो महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवर स्थीत आहेतआर्य द्रविड या संज्ञा अशा आहेत की, त्या वंशनिदर्शक म्हणून वापरल्या गेल्याने त्यावर रणे माजली आहेत. भारतात इतक्या मोठया प्रमाणात वंश मिश्रण झालेले आहे, की आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वांशिक भेदाच्या गटाचे निदर्शक म्हणून वापरीत आहे. डॉ. सुनितीकुमार चटर्जी यांचे असे मत आहे की,

“A study of the rasical or rather what may be called the language culture ... must be the basic for understanding of Indian Culture.” महाराष्ट्र आणि आंध्र हे दोन्ही प्रदेश भारताच्या जवळ जवळ मध्यावर वसलेले आहेत. त्यामुळे दोन्ही प्रदेशातील विचारवंतांनी असे म्हटले आहे की, हे प्रदेश म्हणजे आर्य द्रविड संस्कृतीच्या संगमाचे पुण्यक्षेत्र आहेमहाराष्ट्राच्या वसाहतीकरणाचा विचार करुन पुढे डॉ. इरावतीबाई कर्वे म्हणतात की, महाराष्ट्रात उत्तरेकडील व दक्षिणेकडील संस्कृतीचा संघर्ष व संगम झालेला आढळतो महाराष्ट्रात भाषिक व एकदंर सर्व सांस्कृतिक गोष्टीत द्रविडांचा एक स्तर आहेच. अशी स्पष्ट कबुली श्री ग्रामोपाध्ये या भाषा शास्त्रज्ञाने दिलेली आहे. तेलुगू लोकाप्रमाणेच तेलुगू भाषा सुध्दा आर्य द्रविड संस्कृती साधणारी आहे असे म्हटले जाते. या प्रदेशात संस्कृती संगम होण्याला जी कारणे घडली ती पुढील प्रमाणे.

1 भौगोलिक दृष्टया निकट, साहचर्य

2 एक इतिहास

3 संकटकाली परस्परांच्या प्रदेशात स्थलांतर

4 मिश्र विवाह

5 संमीश्र संस्कृती

6 धर्म प्रचार

7 व्यापार धंदा या निमित्ताने वैयक्तिक आणि सामुदायिक स्थलांतर

पहिले कारण म्हणजे भौगोलिक दृष्टया निकट साहचर्य, तेलंगणा आणि मराठवाडा भौगोलिक दृष्टया इतके जवळ वसलेले आहेत की, नांदेड जिल्हयातील देगलूर गावापासून दोन मैलावर आंध्र प्रदेशाची सरहद् सुरु होतेतसेच नांदेड जिल्हयातील भोकर तालुक्यातील किनी पाळज या गावापासून 3 कि.मी. अंतरावर तेलंगणा प्रदेशाची सरहद् सुरु होते

सांस्कृतीक जीवन : सीमाप्रदेशातील साज सांस्कृतीक दृष्टया संपन्न असा समाज आहे. याभागातील लोकजीवन अभ्यासण्याच्या दृष्टीने त्यांचे सांस्कृतीक जीवन जाणून घेणे अत्यंत महत्वाचे ठरते. कोणतीही संस्कृती भौगोलिक प्रदेश आणि निसर्गाशी समायोजन साधणारी असते. संस्कृतीच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण अनेक समाज मानसशास्त्रज्ञानी केले आहे. टायलरच्या मते ज्ञान विश्वास, कला, नीती, कायदा, चालिरिती, व समाजाचा सभासद म्हणून मानव, संपादन करीत असलेल्या सर्व क्षमता व सवयींना अंतर्भाव म्हणजे संस्कृती होय. संस्कृती प्रगत असो की, अप्रगत नागर असो वा आदिम तिच्यामध्ये साहित्य हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणता येईल. त्या समाजातील साहित्य त्या संस्कृतीला प्रवाहित बनवित असते. मौखिक परंपरेने ही साहित्य संस्कृती टिकून असते. म्हणून आपली संस्कृती मौखिक परंपरेने टिकवून ठेवली, व ती समृध्द करण्याचा प्रयत्न ही केला आहे

लोकगीत : लोकवाङ्मयातील लोकगीतात मानवी जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या पारंपारिक लोकजीवनाचा आरसा असलेल्या या लोकगीतांतून मानवी जीवनातून घटना,प्रसंगा व मनातील विविध भावतरंग याचे सामूहिक प्रत्यंतर येते. लोकगीतातून मानवी जीवनातील विविध भावभावना बरोबरच उदात्त विचार आणि उदात्त जीवन मूल्यांचा प्रत्यक्ष अविष्कार पहायला मिळतो. प्राचीन काळापासून लोकगीतांची रचना, निर्मिती समाजव्यवस्थेत समाज व्यवहारासाठीच होत आलीलोकवाङ्मयात विविधता आहे. मानवी भाव भावनांचे उत्कट मनोवेधक चित्रण असतेलोकगीत म्हणजे काय लोकसाहित्यात लोकगीतांना महत्वपूर्ण स्थान आहे. लोकगीतांच्या संदर्भात एनसायक्लोनोपिडीया ब्रिटानिका मध्ये एका ठिकाणी स्पष्ट केले आहे कोणत्याही गीत अथवा संगीत लोकगीतावर निर्भर, अधिष्ठित आहेसंगीताच्या दृष्टीने लोकगीते कसल्याही वादययंत्रणाशिवाय स्वाभाविकपणे हदयस्पर्शी स्वरांचे प्रतिनिधीत्व करतात. मानव जातीच्या ह्यदय सागरातून प्रकृती ध्वनीने आणि सहजस्फूर्ततेने प्रकट होणारे लोकगीत हे संगीतच आहेआपल्या हदयावरील भार, थकवा हलका होउन आनंद प्राप्तीस्तव त्यातून विविध भाव भावनांची अभिव्यक्ती अतिष्कृत होते. आणि ते बोलण्यापेक्षा गाउन प्रदर्शित करता येतेडॉ.प्रभाकर मांडे यांच्या मते लोकगीत म्हणजे लोकसमुहाचे अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत आलेले आदिकालीन स्वयंस्फूर्त व संगीतमय गीत होय. सीमा प्रदेशातील

लोकगीतांमध्ये स्त्री गीतांची संख्या अधिक आहेलोकगीतांना स्त्री जीवनात महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे स्त्रीयांच्या जीवन जाणीवा समजून घेण्यासाठी स्त्री गीतांचा अभ्यास करणे महत्वाचे आहेसमाज संस्कृतीच्या जडणघडणीत स्त्रियाचा सिंहाचा वाटा आहेतेलंगणा आणि महाराष्ट्र सीमेलगत राहणाऱ्या लोकांची संस्कृती आणि लोकगीते जवळपास एकसारखीच वाटतात. या गीतांत बरेच साम्य आहेतेलंगणात व महाराष्ट्राच्या सानिध्यात सर्वात मोठा परिणाम भाषेवर झालेला आहे. स्त्रिगीतातून पारंपारिक स्त्रिच्या जगण्याचे संपूर्ण प्रतिबिंब पडलेले दिसतेमहाराष्ट्रातील मुली साधारणत आश्विन महिन्यात पाटावर रांगोळी काढून त्यावर भुलाबाईच्या खेळ मांडतात. भोलानाथ म्हणजे शंकर आणि त्यांची पत्नी पार्वती यांचेच उत्सव असावेत असा अभ्यासकांचा कयास आहे. यालाच काही ठिकाणी भोंडला किंवा हादला असेही म्हणतात. भूलाबाईची पुजा करतांना, त्या ़ऋतून येणारी सगळी फुले गोळा करतात आणि शेणाच्या गौरीला सजवितात आणि पाण्यात सोडतातततसेच तेलंगणामधील मुली याच महिन्यात म्हणजेच भाद्रपद महिन्याच्या अमावस्येपासून बोडयम्मा हे खेळ खेळतात. असा 15–20 दिवसाचा खेळ असतो. दसऱ्याच्या 8–10 दिवस अगोदर बोडयम्मा हे सण साजरा करताततउदा. ऐलोमा–कैलोमा ज्ञानेश्वर देवा, करील तुझी सेवा अशा प्रकारची गाणी सर्व मुली एकत्रित मिळून गातात.ऐलोमा कैलोमा ज्ञानेश्वर देवा, करील तुझी सेवा हत्तीच्या सोंडेवर पेरला मोगरा नगरावरती गेला, नगरच्या राजने शाळा मस्त केली, आमची भुलाबाई माडीवरीती गेली धुनं धुय गं बाई, गज गोत्यावरी वाळू घाल गं बाई गडावर गड माहूर गड, तेथला सोनार करणीवर सोनारानं आणला पत्याचा जोड घ्या घ्या भुलाबाई पत्याचा जोड तिची सुटली वेणी, धावा धावा कोणी धावतील तिचे धनी... अशी गीते भुलाबाईच्या सोहळयात रंग भरतात आणि महाराष्ट्रात गौरीची गीते फार महत्वाची मानतात अशा गीतांतून महाराष्ट्र संस्कृतीच्या कुळधर्माची परंपरा सुध्दा लक्षात येते. जी गीते मराठीतून आहेत तशीच गीते तेलुगू भाषेतही आहेत. बोडयम्मा हे सण साजरा करतांना हे गीत म्हणतातबोडयम्मा बोडयम्मा कोलू

नि बिडया दोस्साने कोलू
नि बिडया इन्टीकाडा कोलू
निसमल्या शेटटू कोलू
निसमल्या शेटटूके कोलू
योडू मोग्गाले कोलू
योडू मोग्गाला पत्ती
यत्याडे पत्ती कोलू
हा पत्ती ही पत्ती कोलू
नेयावरा सालोडया कोळू
नेलकू ओक्का दटटी कोलू

हे गीत सर्व मुली एकत्रित येउन गीत गातात. बदकम्मा म्हणजे मुलगी होय. अशा प्रकारे दोन्ही भाषेतील गीत तेथे गायली जातात. शेतात काम करतेवेळी सर्व स्त्रिया एकत्र आल्यावर गाणी म्हणतातपाउस पडेल या उद्देशानी गातात. आभाळाकडे पाहून पाउस जवळजवळ आलेला आहे. आता इथे यायला काहीच वेळ लागणार नाही

पच्चा बट्टा पच्चा रैक्या,
वी वाणा डल्लो...
पटणमू अंदू कुनैयो,
मुगी बट्टा मुगी रैक्या
वी वाणा डल्लो...
मुदयाडम अंदू कुनैयो
नल्ला बट्टा नल्ला रैक्या
वी वाणा डल्लो
नंदयाडम अंदू कुनैयो

या गाण्यात वेगवेगळया रंगाचे नाव घेवून रंगाच्या नावाच्या पहिल्या अक्षरापासून जे गाव आहे. त्या गावाचे शहराचे नाव घेउन पाउस पोहोचला आहे. असे गायीली जाते. पटणमू अंदू कुनैयो, म्हणजे पाउस हैद्राबादला येउन पोहचला आहे. मुदयाडम अंदू कुनैया म्हणजे मुधोळला आला आहेनंदयाडम अंदू कुनैयो, म्हणजे नांदेडपर्यंत पाउस आला आहे. आता आपल्या शेतात पाउस येईल असा होतो. या गीतात तेलंगणा आणि महाराष्ट्रातील दोन्ही जिल्हयाची गावाची नावे आली आहेत. हैद्राबाद, मुधोळ –जि.आदिलाबाद आणि नांदेड या शहराचा उल्लेख येथे आला आहे. या गीतातून भाषेचा परिणाम दिसून येतो. या तेलुगू गीतातून असे दिसून येते की, येथे दोन भाषिक लोक एकत्र येतात. तेलंगणा आणि महाराष्ट्र संस्कृतीचा संगम झालेला आहे. तिथे भाषेची विविधता दिसून येते. आणि विविधतेतून एकता नांदते आहे. मराठी भाषेची संस्कृती आणि तेलुगू भाषेची संस्कृती या दोन भाषेचा मिलाप या भागात दिसून येतो. लोकसंस्कृतीचा अभ्यास लोकजीवनाच्या अनुषंगाने होणे महत्वाचे आहे

निष्कर्ष :

1 संस्कृतीच्या प्रभावाने व्यक्ती आणि समुहाचे वर्तन बदलते.

2 संस्कृती आणि समाज यांचे नाते परस्पर पुरक

आहे. आणि लोकसंस्कृतीत अनेक बाबतीत साम्य आहे.

3 लोकगीतातून समाज जीवनाचे दर्शन घडते.
4 लोकगीतातून संमीश्र संस्कृतीचा प्रत्यय आलेला दिसून येतो.

5 संस्कृती आणि भाषा यांचा मिलाप झालेला दिसून येतो आणि भाषा विविधतेतून एकता नांदते आहे.
6 लोकगीतातून संस्कृतीचे जतन व संवर्धन होत असते.
7 संस्कृतीतून मानवाची सभ्यता दिसून येते, आणि या सभ्यतेतून माणूस व मानवीसमाज असतो

संदर्भ

1 डॉ. प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे स्वरुप, आ. पहिली 1978, परिमल प्रकाशन , औरंगाबाद.
2 डॉ. दत्ता भोसले : लोकसंस्कृती बंध अनुबंध, पदमगंधा,प्रकाशन पुणे.

3 डॉ. दत्ता भोसले : लोक संस्कृती स्वरुप विशेष, प्रथमावृत्ती 2004 पदम गंधा प्रकाशन पुणे.
4 डॉ. पुरुषोत्तम कालभूत : लोकसाहित्य स्वरुप विवेचन, विजय प्रकाशन नागपूर.
5 डॉ. सदा कराडे : समाज आणि साहित्य, लोकवाङमय गृह भूपेश गुप्ता भवन, 85, सयानी रोड प्रभादेवी , मुंबई.

6 डॉ. ताराबाई परांजपे : सीमा प्रदेशातील भावगंगा, मराठी साहित्य परिषद हैद्राबाद.
7 डॉ. शरद व्यवहारे : मराठी स्त्रीगीते, प्रतिमा प्रकाशन पुणे 1991

8 डॉ. ना.रा. शेंडे : लोकसाहित्य संपदा, विदर्भ साहित्य संघ, नागपूर.